मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) आधारावर आकाशचिन्हे (होर्डिंग), अ‍ॅडपोल व बॅकलिट अ‍ॅड बोर्ड उभारणी करुन जाहिरात प्रसिध्द करण्याचे अधिकार हक्क प्रदान करणेबाबत. (टेंडर आयडी क्र. २०२३_MBMC_८८८४३८_१)

# करारनामा

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प)

**CHALLAN**
**MTR Form Number-6**

| GRN | MH012405761202324P | BARCODE | | Date | 14/12/2023-17:51:37 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Non-Judicial Stamps-Consolidated Stamp Duty<br>Superintendent of Stamps | **TAX ID / TAN (If Any)** | |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | THD_JT DIST REGISTRAR THANE RURAL | **Full Name** | MESSERS SOLUTIONS ADVERTISING |
| **Location** | THANE | | |
| **Year** | 2023-2024 One Time | **Flat/Block No.** | 204 MINT INDIABULLS |

| **Account Head Details** | **Amount In Rs.** | | |
|---|---|---|---|
| | | **Premises/Building** | |
| 0030045501 Consolidated Stamp Duty85 | 517100.00 | **Road/Street** | BEHIND HIRANANDANI MEDOWS NEAR HYDE PARK |
| | | **Area/Locality** | NATH PAI ROAD THANE WEST |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | 4 0 0 6 0 7 |
| | | **Remarks (If Any)** | |
| | | TENDER FOR HOARDING ADPOLE BACKLIT ADBOARD IN MBMC ON BOT PERIOD 1 PLUS 9 YRS T ID 2023MBMC888438 1 | |
| | | **Amount In Words** | Five Lakh Seventeen Thousand One Hundred Rupees Only |
| **Total** | 5,17,100.00 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Payment Details** | SBIEPAY PAYMENT GATEWAY | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 10000502023121406600 | 4568525061223 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 14/12/2023-17:52:21 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | SBIEPAY PAYMENT GATEWAY | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :
Mobile No. : 9930004900

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे . नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही .

SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



**Print Date 14-12-2023 05:54:12**

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

# // करारनामा //

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) आधारावर आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड उभारणी करुन जाहिरात प्रसिध्द करण्याचे अधिकार हक्क प्रदान करणेबाबत. (टेंडर आयडी क्र. २०२३_MBMC_८८८४३८_१)**

हा करारनामा मुक्काम भाईदर, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आज दिनांक १४/१२/२०२३ माहे डिसेंबर सन २०२३ रोजी.

**मिरा भाईदर महानगरपालिका,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत स्थापन केलेल्या महानगरपालिका याकरीता आणि वर्तीने उपायुक्त श्रीम. कल्पिता पिंपळे (जाहिरात), कार्यालय पत्ता – स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, तालुका व जिल्हा ठाणे या ठिकाणी आहे (यानंतर 'एम.बी.एम.सी.' असे संबोधण्यात येईल) (ज्याचा अर्थ आणि संदर्भास बाधा होत नसल्यास त्या त्या वेळी उप-आयुक्तांचे कार्यालयाचा पदभार सांभाळणारे त्यांचे उत्तराधिकारी आणि असाईनीज (अभिहस्तांकिती) यांचा सुध्दा समावेश असल्याचे मानले जाईल) ते प्रथम पक्षकार.

आणि

**मे. सोल्युशन ॲडर्व्हटायजिंग, पार्टनरशिप फर्म** याकरीता आणि वतीने श्री. विशाल प्रविण सोलंकी, कार्यालय पत्ता - मे. सोल्युशन ॲडर्व्हटायजिंग, २०४, इंडिया बुल्स मींट, हाईड पार्क जवळ, हिरानंदानी मिडोस मागे, ठाणे (पश्चिम) ४००६१० या ठिकाणी आहे (यानंतर 'लायसेन्सी' असे संबोधण्यात येईल) (ज्याचा अर्थ आणि संदर्भास बाधा होत नसल्यास सदर फर्मचे सध्याचे भागीदार आणि अखेरचे उत्तरजीवी भागीदारांचे वारसदार, कारभारी यांचा सुध्दा समावेश असल्याचे मानले जाईल.) ते द्वितीय पक्षकार, यांच्या मध्ये करारनामा करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा नुसार मिरा भाईदर महानगरपालिका ही रस्ते, फरसबंदी, पायरस्ते वगैरे सारख्या सार्वजनिक मालमत्तेची मालक आणि परिक्षक असून कलम २४४ आणि २४५ अन्वये व महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अन्वये महानगरपालिकेच्या मालकीच्या सार्वजनिक ठिकाणी कोणाही पात्र व इच्छुक पक्षकार यांना जाहिरातीची परवानगी देण्याची तरतुद आहे. सदर प्राप्त अधिकारान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेची ही इच्छा निविदा सुचना रुपाने दै. नवशक्ती, महाराष्ट्र जनमुद्रा व दै.इकॉनॉमी टाईम्स दि.२४/०३/२०२३ रोजीच्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द करण्यात आली, ज्याद्वारे विशिष्ट मोजमाप, आकारातील पुर्वनिश्चित केलेल्या माध्यमातील जाहिराती विशिष्ट ठिकाणी BOT (बांधा, वापरा व हस्तांतरीत करा) तत्वावर आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व वॅकलिट ॲड वोर्ड उभारुन जाहिरात प्रदर्शित करण्याचे अधिकार देण्याकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या.

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिकाही आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व वॅकलिट ॲड वोर्ड च्या स्वरुपात जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी देण्यात आलेली स्थाने/जागांची एकमेव कायदेशिर कब्जेदार

SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

आणि धारक अथवा पुरेशी अधिकार आहे, (अशा ठिकाणांची यादी निविदा पुस्तिकेसोबत 'जोडपत्र 'अ' म्हणून संलग्न केली आहे.)

आणि ज्याअर्थी, प्रशासकिय ठराव क्र.१४७, दि.०५/०७/२०२३ अन्वये महानगरपालिकेच्या जागेवर १ वर्ष (जाहिरात माध्यमे उभारणेकामीसाठीचा कालावधी) + ९ वर्ष (जाहिरात प्रसिध्द करण्याचा कालावधी) या कालावधीकरीता BOT तत्वावर आकाशचिन्हे (होर्डिंग), अॅडपोल व बॅकलिट अॅड बोर्ड उभारुन जाहिरात प्रसिध्द करणेचे हक्क प्रदान करण्यासाठी प्रसिध्द केलेल्या सुचनेनूसार प्राप्त निविदांपैकी मे. सोल्युशन अॅडव्हर्टायजिंग यांचे जास्त दराची निविदा स्विकारुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कार्यादेश देणेस मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरचा करारनामा जोडपत्र 'अ' मध्ये नमुद ठिकाणी BOT तत्वावर १ वर्ष (जाहिरात माध्यमे उभारणेकामीसाठीचा कालावधी) + ९ वर्ष (जाहिरात प्रसिध्द करण्याचा कालावधी) या कालावधीकरीता जाहिरातीचे अधिकार प्रदान करणे करीता करण्यात येत आहे. आणि यांतील पक्षकार यांनी आपसांत ठरविल्यानुसार अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे लेखी नोंद करण्याचे मान्य केले आहे.

## अटी व शर्ती

**[१] कराराच्या सर्वसाधारण अटी :-**

**१.१ कराराची व्याप्ती: -**

अ) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील जागेवरती (निविदे पुस्तिकेमधील जोडपत्र 'अ' मधील नमुद ठिकाणी) BOT तत्वावर १ वर्ष (जाहिरात माध्यमे उभारणेकामीसाठीचा कालावधी) + ९ वर्ष (जाहिरात प्रसिध्द करण्याचा कालावधी) या कालावधीकरीता आकाशचिन्हे (होर्डिंग), अॅडपोल व बॅकलिट अॅड बोर्ड उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याकरीता द्वितीय पक्षकार यांना अधिकार देण्यांत येत आहेत.

ब) विनिर्दिष्ट केलेल्या स्थांनाव्यतिरिक्त कोणतीही अतिरिक्त जागा किंवा ठिकाणांचा वापर केल्यास, अशावेळी सदर व्दितीय पक्षकार यांनी या निविदेच्या नियमांचे उल्लघंन केले आहे असे मानून द्वितीय पक्षकार यांच्यावर प्रथम पक्षकार कारवाई करील, जी अंतिम कारवाई असेल.

**१.२ कराराचा कालावधी आणि सुरुवात :-**

अ) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील जागेवरती (निविदे पुस्तिकेमधील जोडपत्र 'अ' मधील नमुद ठिकाणी) BOT तत्वावर १ वर्ष (जाहिरात माध्यमे उभारणेकामीसाठीचा कालावधी) + ९ वर्ष (जाहिरात प्रसिध्द करण्याचा कालावधी) या कालावधीकरीता आकाशचिन्हे (होर्डिंग), अॅडपोल व बॅकलिट अॅड बोर्ड उभारुन जाहिरात प्रसारीत करण्याकरीता द्वितीय पक्षकार यांना अधिकार देण्यांत येत आहेत. सदर कालावधीची सुरूवात व्दितीय पक्षकार यांना कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून होईल. प्रथम पक्षकार यांनी सदरचा करारनामा रद्द करणे, वाढीव मुदत देणे, नुतनीकरण करून देणेकरीताचे अधिकार राखून ठेवले आहेत.

SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

ब) द्वितीय पक्षकार यांनी निविदा कालावधीमध्ये भरणा करावयाची महसूल रक्कम वेळोवेळी भरल्यास व अटी-शर्तीचा कोणताही भंग न केल्यास व त्यांचेकाम समाधानकारक वाटल्यास पुढील मुदतवाढ मिळू शकेल. परंतु मुदत वाढवून देणे प्रथम पक्षकार यांना बंधनकारक असणार नाही.

क) कार्यादेश/ करारनामा झाल्याचे तारखेपासून महानगरपालिकेने निश्चित केलेल्या स्ट्रक्चर डिझाइन प्रमाणे आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्डचे उभारणी एक वर्ष या कालावधीत पूर्ण करावे लागेल व सदर बाबत स्ट्रक्चर स्टॅबिलीटी सर्टीफिकेट महानगरपालिकेस सादर करावे लागेल व जाहिरात माध्यमे उभारली असलेबाबत महानगरपालिकेस लेखी कळवावे लागेल. त्याबाबतची तपासणी महानगरपालिका सार्व. बांधकाम विभागाच्या अभियंत्यामार्फत करुन त्यांच्या अहवालानंतरच द्वितीय पक्षकाराने जाहिरात माध्यमांवर जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

ड) १० वर्षानंतर महानगरपालिकेकडे जाहिरात माध्यमे हस्तांतरण करताना जाहिरात माध्यमे सुस्थितीत व स्ट्रक्चरल ऑडिट करुन स्ट्रक्चर स्टॅबिलीटी प्रमाणपत्रासह जमा करणे व्दितीय पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहील.

**१.३ जाहिरातीची साधने उभारणे व काढून टाकणे :**

अ) जाहिरात माध्यमे उभारणे करण्याकरिता लागणारा भांडवली व महसुली खर्च करण्याची जबाबदारी ही व्दितीय पक्षकार यांची असून त्याकरिता लागणारी यंत्र सामग्री उपलब्ध करण्याची जबाबदारी ही व्दितीय पक्षकार यांची आहे. प्रथम पक्षकार याकरीता कोणताही खर्च देणार नाही.

ब) व्दितीय पक्षकार यांनी प्रथम पक्षकार यांनी मंजूर केलेल्या नकाशानूसार जाहिरात माध्यम फलकाचे काम करावयाचे आहे. सदरचा नकाशा वरील नमुद केलेल्या नियम-२०२२ मधील तरतुदीशी संलग्न असेल.

क) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने त्यांच्या सल्लागारांद्वारे दिलेले विनिर्देशानूसार आणि निश्चित स्थाने यानुसार जाहिरात माध्यमाचे आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड किंवा साधणे उभारणे/काढून टाकणे/प्रसिध्द करणे यासाठी द्वितीय पक्षकार हे सक्तीने जबाबदार असतील.

ड) अशा प्रकारचे जाहिरातीची माध्यमे उभारताना किंवा काढून टाकताना एम.बी.एम.सीच्या मालमत्तेस काही नुकसान झाल्यास द्वितीय पक्षकार हे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या समाधानार्थ त्याची पुर्न:स्थापना करतील. आणि सदर पुर्न:स्थापना किंवा दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर द्वितीय पक्षकार हेच करतील. व मिरा-भाईंदर महानगरपालिकाही सदर दुरुस्ती/ पुन:स्थापना करीता कोणतीही रक्कम सदर द्वितीय पक्षकार यांना देणार नाही.

SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

**१.४ संबंधित प्राधिकरणांची परवानगी :**

सदर द्वितीय पक्षकार हे मिरा-भाईंदर महानगरपालिकाच्या कार्यक्षेत्रात जाहिराती फलक लावणेकरीता संबंधित शासकिय प्राधिकारणांची परवानगी/परवानग्या मिळवतील. सदर परवानग्या मिळविणे करीताचे होणारे खर्च आणि त्याचे शुल्क सदर द्वितीय पक्षकार हेच अदा करतील. त्याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकाआवश्यक पत्रव्यवहार व सहाय्य करेल.

**१.५ देखभाल व दुरुस्ती :**

अ) या कराराचे मुदतीत सदर लायसेन्सी यांनी लावलेले आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड आणि ज्या जागेवर ते उभारण्यांत येतील किंवा आलेले आहेत, त्या जागेची देखभाल व दुरुस्ती महापालिकेच्या समाधानार्थ करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षकार स्विकारीत असून सदर देखभाल व दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर द्वितीय पक्षकार हेच करतील.

ब) होर्डिग्जच्या (जाहिरात फलकाच्या) कोणत्याही कामापासून किंवा आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड या कामामुळे कोणतीही जिवित वा वित्त हानी झाल्यास त्याची जबाबदारी द्वितीय पक्षकार हे स्विकारतील आणि त्यांचे स्व:खर्चाने त्या नुकसानीची किंवा हानीची भरपाई करून देतील.

क) द्वितीय पक्षकार असे मान्य करतात की, महापालिकेकडून नोटीस मिळाल्यावर ते सदर नोटीस मिळाल्यापासून तीन दिवसांत सदर जाहिरातीची माध्यमे आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड लावण्यात झालेल्या दोषांची/कसुरांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ स्वत:चे खर्चाने करतील आणि तसे न केल्यास महानगरपालिका ही कोणतीही पुढील नोटीस किंवा सुचना न देता सदर द्वितीय पक्षकार यांचेच खर्चानें आणि जबाबदारीवर सदर आवश्यक असलेले काम करणेंस मुक्त राहील. सदरचा खर्च द्वितीय पक्षकार यांच्या अनामत रक्कमेतून कपात करण्यांत येईल.

**१.६ आक्षेपार्ह जाहिराती आणि जाहिरातीचे निष्कासन :**

अ) कोणतीही आक्षेपार्ह जाहिरात प्रदर्शित केली जाणार नाही आणि प्रदर्शित जाहिरातीमध्ये काय आक्षेपार्ह आहे या बाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल, जो द्वितीय पक्षकार यांचेवर बंधनकारक राहील. न दिसणारी/अव्यवस्थित /असुरक्षित जाहिराती तसेच वाहतुक नियंत्रणास बाधक ठरणा-या जाहिराती, कायदयाचे उल्लधंन करणा-या किंवा जनतेच्या धार्मिक भावना दुखावतील अशा जाहिराती, तसेच राष्ट्रीय/राजकीय नेत्यांचे फोटो वापरून केलेली मानहानीकारक जाहिराती किंवा कायदयाने बंदी केलेल्या बोधचिन्हांचा वापर करून केलेल्या जाहिराती वगैरे हया आक्षेपार्ह जाहिराती मानल्या जातील.

ब) आक्षेपार्ह अशी कोणतीही जाहिरात महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास द्वितीय पक्षकार यांना २४ तासांची नोटीस देऊन द्वितीय पक्षकार सदर नोटीसीच्या अनुषंगाने सदरची जाहिरात त्वरीत काढण्यास बांधील राहील. आक्षेपार्ह जाहिरात न काढल्यास मनपा कडुन काढण्यात येतील व त्याचा सर्व खर्च द्वितीय पक्षकाराकडुन वसुल केला जाईल.



SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

क) जाहिरातीचे प्रदर्शना संबंधात कोणीही व्यक्ती किंवा प्राधिकरणांनी केलेल्या कोणत्याही प्रकारची कारवाई अथवा कारवाईकरीता द्वितीय पक्षकार हेच जबाबदार राहतील. आणि सदरची कारवाई, खर्च, दावे, आणि या कराराअंतर्गतचे परिणांमापासून द्वितीय पक्षकार हे महानगरपालिकेस दोषमुक्त ठेवतील.

**१.७ कराराचे तसेच नियम आणि विनियमांचे अनुपालन करणे : -**

अ) द्वितीय पक्षकार यांनी या करारानुसार कोणतीही बाब करणेस नकार दिला किंवा हयगय केल्यास अशावेळी महानगरपालिका सदरचे काम करणेसाठी द्वितीय पक्षकार यांना १५ दिवसांची नोटीस देईल आणि तरीही सदर द्वितीय पक्षकार यांनी तशी कामे करणेची हयगय केली किंवा नकार दिल्यास अशावेळी सदर द्वितीय पक्षकार यांचेद्वारे पुढे करण्यांत आलेली हयगय किंवा नकारासंबंधात करावायाच्या कारवाई बाबतचे कोणत्याही अन्य अधिकारांना बाधा न येता महानगरपालिका नकार किंवा हयगय केलेले काम स्वत: करील व सदर केलेल्या कामासंबंधात द्वितीय पक्षकार यांचेकडून त्या संबंधातील खर्च वसूल करणेंस मनपास अधिकार राहील.

ब) महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर (निविदा पुस्तिकेतील 'जोडपत्र-'अ') आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड) उभारण्यास अडथळा निर्माण झाला किंवा मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भविष्यात विकास कामामध्ये आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्डचा अडथळा निर्माण होत असल्यास, सदरच्या जागेतील आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड रद्द किंवा स्थलांतर करणे हा अधिकार प्रथम पक्षकार यांनी राखून ठेवला आहे. तो निर्णय अंतिम राहील व तो निर्णय द्वितीय पक्षकार यांस बंधनकारक असेल. सदर जाहिरात माध्यमे (मिडीया) काढून टाकावयाचे असल्यास सदर वेळी द्वितीय पक्षकार हे ते काढून टाकतील, ज्याबाबतीत सदर द्वितीय पक्षकार यांना त्याकरीता प्रथम पक्षकार यांच्याकडून कोणत्याही मोबदल्याचा दावा करणेस अधिकार राहणार नाही. तथापि हटविण्यांत आलेल्या होर्डिंगचे, हटविल्याच्या दिनांकापासून महसूल रक्कम आकारली जाणार नाही.

क) द्वितीय पक्षकार मान्य करतात की, भविष्यांत राज्य सरकार, केंद्र सरकारद्वारे करण्यांत येणारे सुधार, बदल किंवा फेरफारांचे अनुपालन करण्याची जबाबदारी स्विकारीत आहेत.

ड) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५६ अ च्या पोट कलम (१) यासह आणि कलम २४४ व २४५ या द्वारे शासनाने प्रदान करण्यात आलेल्या व महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ चे काटेकोर पणे पालन करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षकाराची राहील.

SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

इ) द्वितीय पक्षकार मान्य करतात की, संबंधित जाहिरात माध्यमावरील कर उदा. सेवा व वस्तू कर, भविष्यात शासनाकडून लागु होणाऱ्या इतर कराचा भरणा करणे बंधनकारक राहील. सदर करारनाम्यांच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या महसूल रकमेवर वस्तु सेवा कर भरणा करण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहिल. तसेच सदर कामाकरीता कराचा भरणा केल्याबाबतची माहिती योग्य पुराव्यासह महानगरपालिकेस देणे द्वितीय पक्षकार यांचेवर बंधनकारक आहे. तसेच आवश्यक कराचा भरणा महानगरपालिका फंडात करणे बंधनकारक राहील.

**१.८ सर्व दावे, कारवाई नुकसानाबाबत लायसेन्सी/द्वितीय पक्षकार यांची जबाबदारी :**

अ) या कराराद्वारे प्रदान करण्यांत आलेल्या जाहिरात प्रदर्शनाचे अधिकारांची अंमलबजावणी करतांना निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई, मागण्या, नुकसान, याबद्दल सर्वस्वी जबाबदारी द्वितीय पक्षकाराची राहील.

ब) आकाशचिन्हे (होर्डिंग), अॅडपोल व बॅकलिट अॅड बोर्ड वगैरे उभारतांना किंवा काढून टाकताना किंवा इलेक्ट्रीक शॉक लागून किंवा जाहिरातींचे फलक /बोर्ड उडून जाणे/पडणे वगैरे पासून कोणाही व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेस किंवा अन्य व्यक्तींना कोणतीही हानी, नुकसान, दुखापत/इजा किंवा जिवित हानी झाल्यास त्याकरीता सदर द्वितीय पक्षकार हे एकटेच जबाबदार राहतील आणि अशा प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष झालेल्या जिवित किंवा मालमत्तेच्या हानीपासून सदर द्वितीय पक्षकार हे महानगरपालिकस पुर्णत: दोषमुक्त ठेवतील.

क) या कराराची अंमलबजावणी चालू असताना जर संप, टाळेबंद, साहित्याची कमतरता, युध्द, आग, पुर, भुकंप, वादळ, ज्वालामुखी, साथरोग व अन्य नैसर्गिक आपत्ती आल्यास आणि त्यासंदर्भात शासनाने केलेल्या अन्य कायद्यामुळे जर महानगरपालिकेस या कराराची अंमलबजावणी करणे अशक्य झाल्यास अशा परिस्थितीत व्दितीय पक्षकारांस महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागणेचा हक्क वा अधिकार राहणार नाही. तथापि उपरोक्त कारणामुळे कराराची अंमलबजावणी करणे अशक्य झाल्यास सदर कालावधी मधील महसुल रक्कम मा.आयुक्त यांच्या मान्यतेने आकारले जाणार नाही.

ड) या कराराचे मुदतीत कोणत्याही वेळी संप, टाळेबंदी, साहित्याचा तुटवडा, महामारी, युध्द, आग, पुर किंवा कोणतीही सरकारी अधिनियमिती किंवा विनिमय किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाबाहेरील अशा कोणत्याही इतर कारणास्तव या करारात नमुद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार कराराची पुर्तता करणे अशक्य झाल्यास सदर व्दितीय पक्ष यांना कराराची पुर्तता करणेस झालेली असमर्थता या संबंधात व्दितीय पक्ष महानगरपालिकेला ७ दिवसात लेखी कळवेल. याबाबतीत ज्या कालावधीत काम थांबलेले



SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

असेल तेवढा कालावधीची मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रथम पक्ष यांना राहिल. तसेच सदरची नोटीस प्राप्त झाल्यानंतर या कराराची अंमलबजावणी चालू ठेवणेसंदर्भात किंवा करारनामा रद्द /स्थगित करणेबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार महानगरपालिकेला राहील. परंतु त्याबाबत कोणताही दावा करणेचे अधिकार व्दितीय पक्ष यांना राहणार नाही. तसेच मनपाकडे नुकसान भरपाई मागता येणार नाही.

इ) या कराराची अंमलबजावणी चालू असताना जर एखाद्याने फलकावर अनधिकृतपणे/विनापरवानगी जाहिरात लावल्यास व्दितीय पक्षकारांस महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागणेचा हक्क वा अधिकार राहणार नाही.

ई) सदर कराराचे मुदतीत द्वितीय पक्षकार हे महानगरपालिकेच्या कोणत्याही कामापासून किंवा कोणत्याही अदृश्य कारणांपासून किंवा अन्य आधारांवर काम करण्यास अडथळा निर्माण होण्याच्या कोणत्याही कारणांस्तव कोणताही आर्थिक नुकसान व भरपाई बाबतचा दावा महानगरपालिकेकडे करणेचा अधिकार राहणार नाहीत.

**१.९ अधिदानाच्या / महसूलाच्या ((Payment) अटी व अनुसूची :-**

अ) सदर द्वितीय पक्षकार हे महानगरपालिकेस प्रत्येक वार्षिक महसुल दोन समान अर्धवार्षिक हप्त्यात निश्चित केल्यानुसार देतील.

ब) सदर द्वितीय पक्षकार आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्डद्वारे जाहीरात प्रदर्शित करण्याचे अधिकाराबाबतचा ९ वर्षाचा कालावधी हा १ वर्षाचा जाहिरात माध्यमे उभारणेचा कालावधी संपल्यानंतरचे (महानगरपालिका सार्व. बांधकाम विभागाच्या पूर्णत्वाचा अहवालानंतरच्या दिनांकापासून) पहिल्या दिवसापासून सुरु झाल्याचे मानले जाईल.

क) द्वितीय पक्षकार यांनी १ (एक) वर्षाच्या आत आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्डचे उभारणीचे काम पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झाल्यास आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्डद्वारे जाहीरात प्रदर्शित करण्याचे अधिकारा बाबतचा ९ वर्षाच्या कालावधीची मुदत त्याच्या दुसऱ्या दिवसापासून सुरु होईल असे ग्राहय धरण्यात येईल. तसेच एक वर्षाच्या आत जाहिरात माध्यमे उभारुन जाहिरात प्रसिध्द केले असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास सदर जाहिरात माध्यमांकरीता होत असलेला जाहिरात फी चा भरणा करणे बंधनकारक राहील.

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

SOLUTIONS ADVERTISING THANE

ड) महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण), नियम, २०२२ मधील अधिनियमातील कलम २० (क) नुसार वार्षिक देय रक्कम अदा करावी लागेल. तसेच करारामध्ये नमुद केलेल्या नवव्या वर्षातील जाहिरात फी रक्कमेच्या ३०% इतकी होणारी रक्कम बँक गॅरेंटी स्वरुपात भरणा करावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत देकार रक्कम देय तारखेपूर्वी भरणे बंधनकारक राहील. कराराचा कालावधी मधील देय तारखेस देय हप्त्याचे आगाऊ धनादेश कार्यादेश मिळाल्यापासुन ७ दिवसांत जमा करणे बंधनकारक आहे.

इ) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार व प्रशासकिय सभा दि.०५/०७/२०२३ ठराव क्र. १४७ अन्वये दिलेल्या मंजुरी प्रमाणे आकाशचिन्हे (११७ होर्डिंग करीता एकुण ४३५०० चौ.फुट) , ॲडपोल (७७४ करीता एकुण १८७५६ चौ.फुट) व बॅकलिट ॲड बोर्ड (२२२ करीता एकुण ७९९२ चौ.फुट) करीता नमुद केलेला महसूल रक्कमेप्रमाणे वार्षिक रक्कमेचा भरणा करणे द्वितीय पक्षकार यांना बंधनकारक राहील.

ई) १.९ (ब) मध्ये नमुद केल्याप्रमाणे द्वितीय पक्षकार यांनी महसूल रक्कम देण्यास कसुर केल्यास महानगरपालिकेकडे अन्य कायदेशीर उपाययोजना खुल्या असल्या तरी सदर द्वितीय पक्षकार हयांनी सदर जाहिरात फी रक्कम देय झाल्याच्या दिनांकापासून ते सदर रक्कम महानगरपालिकेस ज्यादिवशी मिळाली त्या दिवसापर्यंत (दोन्ही दिवस मिळून) दरसाल १८ टक्के दराने व्याज दयावे लागेल. व्दितीय पक्षकार यांनी सलग ३ महिने सदर वार्षिक महसुल रकमेचा व व्याजाचा भरणा न केल्यास किंवा अशी रक्कम दोन महिन्यापेक्षा जास्त काळ स्वत:कडे ठेवल्यास महानगरपालिकेस सदर करारनामा रद्द करणेचा अधिकार राहील आणि अशावेळी सदर द्वितीय पक्षकार यांनी जमा केलेली प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा इसारा रक्कम किंवा दोन्हीही जप्त करणेंचा अधिकार महापालिकेस राहील.

**१.१० लायसेन्सीची दिवाळखोरी किंवा लायसेन्सीद्वारे कराराच्या अटींचे पालन न करणे:-**

द्वितीय पक्षकाराने कोणतेही दिवाळखोरीचे कृत्य केल्यास किंवा त्यास कोणत्याही न्यायालयाने दिवाळखोर घोषीत केल्यास किंवा त्याने व्यवसाय सक्तीने बंद करणे बाबत न्यायालयाचा आदेश असल्यास अथवा त्याने व्यवसाय बंद करणे बाबत वैधरित्या ठराव केलेला असल्यास किंवा या कराराचे तरतुदीनुसार महानगरपालिकेने प्राप्त केलेल्या जप्तीची अंमलबजावणी शक्य होत नसल्यास, तसेच द्वितीय पक्षकाराने या करारातील कोणत्याही अटीशर्तींची पुर्तता केली नसल्यास महानगरपालिकेस प्रस्तुतचा करार कोणतीही नोटीस न देता रद्द करता येईल. तसेच अशाप्रकारे करार रद्द केल्यानंतर महापालिकेची द्वितीय पक्षकाराकडून येणे असलेली रक्कम वसुल करण्याच्या अधिकारावर कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही. तसेच वरील परिस्थितीत महानगरपालिका द्वितीय पक्षकाराकडून नुकसान भरपाई मागु शकेल. तसेच त्याने महानगरपालिकेचा विश्वासघात/फसवणुक केला म्हणून महानगरपालिका त्याकरीता कायदेशीर कारवाई करू शकेल.

SOLUTIONS ADVERTISING THANE

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**१.११ प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकायांचेकडून कार्यादेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत यशस्वी द्वितीय पक्षकार हे मिरा-भाईंदर महानगरपालिकाला प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) अदा करतील. सदर प्रतिभूती ठेव रक्कम ही द्वितीय पक्षकार यांनी करारामध्ये नमुद केलेल्या (होर्डिंग्स, बॅकलिट ॲडबोर्ड आणि ॲडपोल या स्वतंत्र जाहीरात माध्यमाकरीता) नवव्या वर्षातील जाहिरात फी रक्कमेच्या ३०% इतकी असेल. सदर प्रतिभूती ठेव (Security Deposit) शेड्युल्ड बँक किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट किंवा बँक गॅरंटी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाने देतील. सदर प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) ही सदर कराराच्या अटींची पुर्तता होणेपर्यंतच्या मुदतीकरीता वैध असेल. (सदर प्रतिभुती ठेव रक्कम कराराच्या मुदतीपेक्षा सहा महिने अधिक म्हणजेच एकुण १० वर्ष ६ महिन्यांकरीता (१२६ महिने) वैध असेल.) द्वितीय पक्षकार यांनी वरील नमुद मुदतीत महानगरपालिकेला प्रतिभूती ठेव रक्कम अदा न केल्यास द्वितीय पक्षकार यांनी मनपाकडे जमा केलेल्या इसारा रक्कम जप्त करण्याचा व हा करारनामा रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

**१.१२ प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) परत करणे :-**

सुरक्षा अनामत जमा केल्यानंतर त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब दंड आकारता येणार नाही. सदरची सुरक्षा अनामत रक्कम ही या कराराची मुदत संपल्यानंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकाची कोणतीही देय रक्कम शिल्लक नसल्यास किंवा त्यावर कोणताही दावा नसल्यास मागणी केल्यानंतर द्वितीय पक्षकाराने उभे असलेले जाहिरातीचे स्ट्रक्चर सुस्थितीत असलेबाबत स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी देऊन / हस्तांतरीत केलेची खात्री केले नंतर परत करण्यात येईल.

**१.१३ प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) जप्त करणे :-**

अ) संपूर्ण प्रतिभूती ठेव रक्कम (Security Deposit) किंवा तिचा कोणताही भाग हा सदर द्वितीय पक्षकार यांनी सदर कराराच्या अटी आणि शर्तीचे पालन करणेत कसूर केल्यास किंवा त्याच्या आवश्यकतांची पूर्तता/पालन न केल्यास सदर द्वितीय पक्षकार यांचेविरुध्द सदर महानगरपालिकेस असलेले दावे व अधिकार यांना कोणतीही बाधा न आणता ती प्रतिभूती ठेव (Security Deposit) किंवा तिचा भाग हा जप्त होणेस पात्र असेल.

ब) करार कालावधीत द्वितीय पक्षकाराकडून महानगरपालिकेस येणे असलेली कोणत्याही स्वरूपाची रक्कम ही द्वितीय पक्षकारास अशी नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांत महानगरपालिकेस न भरल्यास ती मिळकत कराची थकबाकी समजून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार सक्तीच्या मार्गाने वसूली केली जाईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन त्यामधुन थकीत रक्कम वसुल करण्यांत येईल.

SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

## १.१४ लायसेन्सीच्या सर्व जबाबदारीचे धोरण :-

सदर द्वितीय पक्षकार हे जाहीराती प्रदर्शित करण्या संबंधातील कामांपासून मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे मिळकतीस कोणतीही हानी, नुकसान होणे किवा व्यत्यय निर्माण झाल्यास अशा पकारची हानी /नुकसान भरपाई करणेची जबाबदारी तसेच व्यत्यय निर्माण झाल्यास व्यत्यय दुर करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षकार यांची राहील किंवा जाहीराती प्रदर्शित करण्या संबंधातील कामांपासून सदर कामाकरीता कर्तव्यावर असलेल्या किंवा त्यांनी नियुक्त केलेले कामगार यांना कोणतीही हानी दुखापत नुकसान होणे तसेच वर्कमेन कॉम्पकन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाईची मागणी यापासून मिरा-भाईंदर महानगरपालिकायांना सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची याद्वारे हमी देत आहेत. आणि अशाप्रकारे सदर ठेकेदार यांचे मालकीच्या जाहिरात साहित्यास सदर कारणांपासून कोणतीही जीवीत अथवा वित्त हानी किंवा नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी मिरा-भाईंदर महानगरपालिकास्विकारणार नाही. तसेच सदर कामाकरीता कर्तव्यावर असलेल्या किंवा त्यांनी नियुक्त केलेले कामगार यांचे विमा पॉलिसी काढणेची संपूर्ण जबाबदारी द्वितीय पक्षकार यांची राहील.

## १.१५ क्षतिपूर्ती (इन्डेमनीटी) :-

अ) सदर द्वितीय पक्षकार हे आकाशचिन्हे (होर्डिंग), ॲडपोल व बॅकलिट ॲड बोर्ड माध्यमाद्वारे जाहिराती प्रदर्शित करण्याच्या कामांपासून मिरा-भाईंदर महानगरपालिकायांचे कोणत्याही मालमत्तेस हानी किंवा नुकसान होणे किंवा वर्कमेन कॉम्पकन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाई मागणी यापासून किंवा कोणाही अन्य व्यक्तींचा मृत्यू अंपगत्व किंवा दुखापत यापासून निर्माण होणारे दावे यापासून मिरा-भाईंदर महानगरपालिकाला सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहेत. आणि सदर संबंधातील सर्व खर्च, आकार किंवा दाव्याचे योग्य प्रकारे मुल्यमापन करुन सदर द्वितीय पक्षकार हे मिरा-भाईंदर महानगरपालिकाने मागणी केल्यावर त्याची तात्काळ भरपाई करून देतील.

ब) द्वितीय पक्षकार यांचेद्वारे झालेल्या कायदयाच्या उल्लघंनापासून मिरा-भाईंदर महानगरपालिकायांना दोषमुक्त ठेवणे. द्वितीय पक्षकार यांचेकडून सदर कराराच्या किंवा ठेक्याच्या मुदतीत कायद्याच्या विरुध्द असतील अशा जाहिराती प्रदर्शित करण्यासंबंधात राज्य किंवा केंद्रसरकार किंवा स्थानिक प्राधिकरणे यांच्या कोणत्याही कायद्याचे किंवा नियम वगैरेचे उल्लघंन झाल्यामुळे आकारण्यात किंवा लादण्यात येणारे दंड, शिक्षा, आणि इतर खर्च वगैरे पासून मिरा-भाईंदर महानगरपालिकायांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहेत.

क) सदर द्वितीय पक्षकार हे सर्व कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन ॲन्ड ऑपरेशन) कायदा व नियम तसेच मिनिमम वेजेस ॲक्ट, बाल मजुर कायदा, इतर लेबर लॉ यासहित सर्व संविधी/पारिनियमांचे पालन करतील आणि सदर कायद्यापासून निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई यापासून मिरा-भाईंदर महानगरपालिकायांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवतील.



SOLUTIONS ADVERTISING THANE

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

## १.१६ लायसेन्सी यांना महानगरपालिकेचे सहाय्य :-

महानगरपालिका सदर द्वितीय पक्षकार यांचेबरोबर असा करार करते की, सदर द्वितीय पक्षकार यांनी या करारातील सर्व अटी आणि शर्तीचे पालन केले आणि सर्व देय रकमा अदा केल्यावर त्यांना कोणत्याही अडथळा किंवा व्यत्ययविना जाहिरातीचे फलक लावणेस अधिकार राहील. परंतु अट क्र.१.७ - अ चे पालन करून आणि जेथे आवश्यकता असेल त्या ठिकाणी सदर महानगरपालिका द्वितीय पक्षकार यांचे खर्चाने सदर द्वितीय पक्षकार यांचे अधिकारांना अडथळा किंवा व्यत्यय निर्माण करणारे किंवा हस्तक्षेप करणारे व्यक्तीविरुध्द योग्य कारवाई करणेंस सहकार्य करील.

## १.१७ ठेका रद्द करण्याची नोटीस :-

अ) सदर करार/ठेक्याच्या मुदतीत सदर द्वितीय पक्षकार यांचे व्यवस्थापन किंवा प्रतिनिधी यांचे बाबत महानगरपालिका असमाधानी होईल असे कोणतेही कारण घडल्यास अशावेळी सदर महानगरपालिका ही द्वितीय पक्षकार यांना लेखी नोटीस देवून सदर नोटीसमध्ये नमुद केलेल्या असमाधानाबाबतच्या त्रुटीचे खुलासा करणेंस सांगेल. सदर द्वितीय पक्षकार हे नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या काळात अशा असमाधानाबाबतच्या कारणांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ दूर करू शकले नाहीत. तर अशावेळी याउलट सदर करारात काहीही नमुद केले असले तरी महानगरपालिकेस द्वितीय पक्षकार यांना १ महिन्यांची पुर्व नोटीस देऊन सदर करारनामा रद्द करण्याचा एम.बी.एम.सी.ला अधिकार राहतील.

ब) पहिला महसुलाचा हप्ता देण्यास कसूर केल्यास किंवा सदर द्वितीय पक्षकार यांनी माघार घेतली किंवा ठेका सुरु केला नाही. अशावेळी द्वितीय पक्षकार यांना १५ दिवसाची पुर्व लेखी सुचना देवून ठेका रद्द करणेचा अधिकार असेल आणि सदर सुचनेचा काळ संपल्यावर सदर करारनामा रद्द होईल. आणि सदर द्वितीय पक्षकार यांची ई.एम.डी. किंवा प्रतिभूती ठेव रक्कम किंवा दोन्हीही जप्त केल्या जातील.

